# बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय

## प्रेसनोट

दिनांक ०५/१२/२०२४

---

शुक्रवार, दिनांक ०६/१२/२०२४ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ६८ वा महापरिनिर्वाण दिन आहे. त्यामुळे चैत्यभुमी, शिवाजी पार्क, दादर, मुंबई या ठिकाणी पवित्र स्तुपाचे दर्शन घेण्यासाठी व श्रध्दांजली वाहण्यासाठी देशभरातून तसेच महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखोच्या संख्येने जनसमुदाय एकत्र येतो. तसेच विविध राजकीय पक्षाचे व संघटनेचे पदाधिकारी तसेच कार्यकर्ते देखील उपस्थित राहतात.

दिनांक ०६/१२/२०२४ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ६८ वा महापरिनिर्वाण दिना निमित्त बृहन्मुंबई शहरात कायदा व सुव्यवस्था राखणेकामी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा. विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या मार्गदर्शनानुसार मा. पोलीस सह आयुक्त (का. व सु.), बृहन्मुंबई ह्यांचे देखरेखीखाली बंदोबस्ताचे नियोजन करण्यात आलेले आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ६८ वा महापरिनिर्वाण दिन सुरक्षितपणे पार पाडण्याकरीता मुंबई पोलीस दलाकडून किमान **०३ अपर पोलीस आयुक्त, ०९ पोलीस उप आयुक्त, १४ सहायक पोलीस आयुक्त यांच्यासह ३७० पोलीस अधिकारी व ३१०० पोलीस अंमलदार तसेच वाहतुक नियमनाकरीता मुंबई पोलीस दलाकडुन** स्वतंत्र असा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आलेला आहे. त्यांचे सोबत महत्वाच्या ठिकाणी एस.आर.पी.एफ. प्लाटून, जलद प्रतिसाद पथक (क्युआरटी), दंगल नियंत्रण पथक, डेल्टा, कॉम्बॅक्ट, बीडीडीएस पथक अशा चोख पोलीस बंदोबस्ताचे आयोजन करण्यात आलेले आहे.

तरी, बृहन्मुंबई पोलीस दलातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ६८ वा महापरिनिर्वाण दिनाच्या अनुषंगाने पोलीसांनी दिलेल्या सुचनांचे पालन करुन पोलीसांना सहकार्य करावे. बेवारस वस्तू आढळल्यास पोलीसांना त्याबाबत तात्काळ माहिती दयावी तसेच आवश्यक प्रसंगी नागरीकांनी तात्काळ पोलीस मदतीसाठी पोलीस हेल्पलाईन १००, ११२ येथे संपर्क साधावा.

*****